**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १७६६/२००७.**

श्री. हरी दाजीबा लंजे,
रा.दांडेगांव, पो. भागडी,
ता.लाखांदूर, जि. भंडारा. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एम. के. फसाटे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रभारी शिक्षणाधिकारी, (माध्यमिक),
जिल्हा परिषद, भंडारा.

श्री. एम. के. फसाटे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी, (माध्यमिक),
जिल्हा परिषद, भंडारा. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.७.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.१.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) मी दिलेल्या दिनांक ३१.८.१९९८, दिनांक ६.९.१९९८, दिनांक ७.९.१९९८, दिनांक ३१.८.१९९९, दिनांक ३.१.२०००, दिनांक २.२.२०००, दिनांक ६.९.२००३, दिनांक २९.१२.२००३ व दिनांक ६.१२.२००६ च्या विनंती अर्जावर काय काय कार्यवाही करण्यात आली व कोणकोणते निर्णय घेतले गेले व दिनांक १७.१०.२००६, दिनांक ८.११.२००६ अर्जावर काय निर्णय घेतले गेले व वेळोवेळी कोणकोणते आदेश पारित केले गेले याबाबतची तपशिलवार माहिती प्राप्त व्हावी.

... २

२) वरील विषयानुषंगाने मला माझे म्हणणे मांडण्याचा अधिकार आहे किंवा नाही हयाबाबतची माहिती मिळावी. ३) वरील कार्यानुसंबंधाने मला मानसिक व आर्थिक हानी झाली असावी काय ? तसेच माझे शारिरिक कुपोषण झालेले असावे काय ? हयासंबंधाने कोणकोणते अधिकारी दोषी आहेत त्यांची नांवे व पदनामे व पत्ते याबाबत माहिती मिळावी. ४) वरील सर्व संबंधाने दोषींना कशी व काय शिक्षा करता येईल व माझ्या झालेल्या सर्व प्रकाराच्या नुकसानांची कशा प्रकारे भरपाई करता येईल हयाबाबत सविस्तर तपशीलने माहिती प्राप्त व्हावी. मी प्रत्यक्ष येवून घेवून जाण्यास तयार आहे. माहिती तयार झाल्यानंतर (०७१८१) २०२०७६ हया नंबर वर कळवावे. सदरच्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ९.१.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी अपीलकर्ता यांना आपले प्रकरण न्यायप्रविष्ठ होते त्याबाबतचा मा. न्यायालय यांचे निर्णयानुसार प्रकरण खारीज झालेले आहे. याबाबतची जाणीव या कार्यालयाचे दिनांक ८.९.२००६ अन्वये यापूर्वी आपणास कळविण्यात आलेले आहे. अनुक्रमांक २, ३ व ४ चे बाबत प्रश्नार्थक माहिती विचारणा केली असल्यामुळे केंद्रीय माहिती अधिकार, २००५ माहिती उपलब्ध करुन देण्याची तरतुद नाही. आपणाला कोणती माहिती पाहिजे आहे याबाबत शासनाने विहित केलेले शुल्क भरुन कार्यालयात उपलब्ध अभिलेखाचे छायाप्रती उपलब्ध करुन घेता येईल असे कळविण्यात आलेले दिसते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, (माध्यमिक), भंडारा यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३०.४.२००७ रोजी कळविण्यात आलेले दिसते व त्यामध्ये त्यांनी या कार्यालयाचे पत्र दिनांक ९.१.२००६ चे पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. आपले प्रकरण न्यायप्रविष्ठ असतांना तसेच मा.न्यायालयाचे निर्णयानुसार खारीज झालेले असतांना मा. न्यायालयीन निर्णयानुसार कायद्याचा भंग झालेला नाही. तरी आपणास कायद्याचा भंग झाला असे वाटत असल्यास आपण योग्य न्यायोचित मार्गाचा अवलंब करावा असे उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी कळविलेले दिसते व त्यामुळे समाधान न झाल्याने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील अपीलकर्ता यांनी सादर केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक २.१.२००७ च्या अर्जातील मागितलेल्या माहितीच्या मुद्या क्रमांक २, ३ व ४ हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अर्जाप्रमाणे नाही हे दिलेले उत्तर बरोबर आहे. परंतु मुद्या

क्रमांक १ मध्ये अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक ३१.८.१९९८, दिनांक ६.९.१९९८, दिनांक ७.९.१९९८, दिनांक ३१.८.१९९९, दिनांक ३.१.२०००, दिनांक २.२.२०००, दिनांक ६.९.२००३, दिनांक २९.१२.२००३ व दिनांक ६.१२.२००६ च्या विनंती अर्जावर काय काय कार्यवाही झाली तसेच दिनांक १७.१०.२००६ व दिनांक ८.११.२००६ अर्जावर काय कार्यवाही झाली व कोणते निर्णय घेतले गेले व वेळोवेळी कोणकोणते आदेश पारित केले गेले याबाबतची तपशिलवार माहिती प्राप्त व्हावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपात असल्यामुळे त्या प्रश्नामध्ये कार्यवाही झाली त्याची छायाप्रत उपलब्ध करुन देणे असा होतो व त्याप्रमाणे त्यांच्या अर्जातील काय काय कार्यवाही झाली किंवा कार्यवाही झाली नाही हयाबद्यलची माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु दिनांक ८.९.२००६ च्या पत्राप्रमाणे कळविण्यात आले आहे असा असंबंध उत्तर दिलेले दिसून येते. दिनांक ८.९.२००६ चे पत्र हे जिल्हाधिकारी, भंडारा यांच्या दिनांक १८.८.२००६ च्या पत्रानुसार त्याचा अर्थ अपीलकर्ता यांनी जी विनंती अर्ज केलेला आहे. परंतु विनंती अर्जाचे कार्यवाहीच्या संदर्भात दिलेले उत्तर नाही व त्यामुळे जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. अधिनियमाचे कलम २० प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नसेल किंवा दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिलेली असेल तरी सुध्दा जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. त्यामुळे अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्तीस पात्र आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची सुनावणी न घेता व कारणमिमांसा निर्णय न दिल्यामुळे अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे व त्यामुळे त्यांना ताकीद देणे हे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक २.१.२००७ च्या अर्जातील मुद्या क्रमांक १ मध्ये नमुद केलेली विनंती अर्जाचे संदर्भामध्ये काय कार्यवाही झाली याबद्यल कागदपत्रांच्या छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक २.१.२००७ च्या अर्जातील मुद्या क्रमांक १ प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये १०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसूली ही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांनी वसुल करावी.

३) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन कारणमिमांसा देणारा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाचे उल्लंघन केलेले असल्यामुळे त्यांना ताकीद देण्यात येत आहे.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांना पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावा.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ३.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**